संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ
(नॅकद्वारा 'अ' मानांकन प्राप्त)

जनसंपर्क विभाग

# विद्यार्थ्यांनो सामाजिक दृष्टीकोन ठेवा - कुलगुरू

## विद्यापीठात रा.से.यो. व 'स्वच्छ भारत - स्वस्थ भारत' पुरस्कार प्रदान

अमरावती -

पदवी घेवून सार्थकता न मानता विद्यार्थ्यांनी समाजाभिमुख व्हावे, तसा दृष्टीकोन त्यांनी सातत्यपूर्ण ठेवावा, असे विचार कुलगुरू डॉ. मुरलीधर चांदेकर यांनी मांडलेत. विद्यापीठाच्या डॉ.के.जी. देशमुख सभागृहात रा.से.यो. कार्यक्रम अधिकारी सत्रारंभ सभा, राष्ट्रीय सेवा योजना व स्वस्थ भारत - स्वच्छ भारत पुरस्कार वितरण समारंभाचे आयोजन करण्यात आले, याप्रसंगी अध्यक्षस्थानावरुन ते बोलत होते. व्यासपीठावर रा.से.यो. प्रभारी संचालक डॉ. राजेश बुरंगे, अकोला जिल्हा समन्वयक डॉ. संजय तिडके, बुलढाणा जिल्हा समन्वयक डॉ. दिपक नागरिक, वाशिम जिल्हा समन्वयक डॉ. शुभांगी दामले आदी मान्यवर उपस्थित होते.

पुरस्कार प्रदान केल्यानंतर मार्गदर्शन करतांना कुलगुरू डॉ. मुरलीधर चांदेकर म्हणाले, पुरस्कार प्राप्तकर्त्यांचे मी मनापासून अभिनंदन करतो. महाविद्यालयातील शिक्षक रा.से.यो.च्या माध्यमातून सातत्यपूर्ण कार्य करुन विद्यार्थ्यांना घडवितात. आमच्या विद्यार्थ्यांमध्ये प्रचंड क्षमता आहे, त्या क्षमतेचा उपयोग रा.से.यो.च्या माध्यमातून सामाजिक कार्यासाठी होतो, ही आनंदाची बाब आहे. शिक्षणानंतर नोकरी हे पॅरामिटर बदलण्याची गरज असून समाजाच्या विकासासाठी शिक्षितांनी पुढे येण्याची आवश्यकता आहे. रा.से.यो.च्या माध्यमातून समाजविकास घडू शकतो, त्यामुळे शिक्षणक्षेत्रात कार्यरत सर्वांनी आपल्या व्यवहारातून सामाजिक दृष्टीकोन निर्माण करावा, असे आवाहनही कुलगुरूंनी याप्रसंगी केले.

शिक्षणक्षेत्रात प्रचंड ताकद आहे, उन्नत भारत अभियानांतर्गत समाज परिवर्तनाचे महत्वाचे कार्य शिक्षणाच्या माध्यमातून घडून येईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. राज्यस्तरावरील आपत्ती व्यवस्थापन केंद्र चिखलदरा येथे स्थापन करण्यात येणार असल्याची माहिती याप्रसंगी कुलगुरूंनी दिली.

रा.से.यो. कार्यक्रम अधिकारी सत्रारंभ सभेत शैक्षणिक सत्र २०१८-१९ मध्ये विद्यापीठ स्तरावर उत्कृष्ट ठरलेल्या एकक, कार्यक्रम अधिकारी, रा.से.यो. स्वयंसेवक यांना कुलगुरूंचे हस्ते पुरस्कार देवून सन्मानित करण्यात आले. त्यामध्ये उत्कृष्ट महाविद्यालय एकक पुरस्कार भारतीय महाविद्यालय, मोर्शी, उत्कृष्ट पुरुष कार्यक्रम अधिकारी पुरस्कार डॉ. संदीप राऊत, भारतीय महाविद्यालय, मोर्शी, उत्कृष्ट महिला कार्यक्रम अधिकारी पुरस्कार डॉ. स्मीता जाधव, कला व वाणिज्य महाविद्यालय, कुऱ्हा, जि. अमरावती, उत्कृष्ट महिला रासेयो स्वयंसेवक पुरस्कार कु. सुषमा गोबाळे, जगदंबा महाविद्यालय, अचलपूर, उत्कृष्ट पुरुष रासेयो स्वयंसेवक पुरस्कार अमित शिंदे, शासकीय विदर्भ ज्ञान विज्ञान संस्था, अमरावती यांना प्रदान करण्यात आला. स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड येथे संपन्न झालेल्या आपत्ती व्यवस्थापन - आव्हान स्पर्धेत उत्कृष्ट स्वयंसेवक पुरस्कार प्रसाद गुल्हाने याचा तसेच विद्यापीठाने पटकाविलेले फिरते चषक याप्रसंगी कुलगुरूंनी कार्यक्रम अधिकाऱ्यांना हस्तांतरीत करुन त्यांचा सत्कार करण्यात आला.

स्वच्छ भारत - स्वस्थ भारत पुरस्कार अमरावती जिल्ह्यांतर्गत जे.डी. पाटील सांगळुदकर महाविद्यालय, दर्यापूर आणि प्रा. राम मेघे कॉलेज ऑफ इंजिनिअरींग ॲण्ड मॅनेजमेंट, बडनेरा, अमरावती, अकोला जिल्ह्यांतर्गत श्री शिवाजी कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, अकोला आणि श्री राधाकिसन लक्ष्मीनारायण तोष्णीवाल विज्ञान महाविद्यालय, अकोला, बुलढाणा जिल्ह्यांतर्गत श्री व्यंकटेश कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, देऊळगांव राजा, बुलढाणा आणि सहकार महर्षि स्व. भास्करराव शिंगणे कला महाविद्यालय, खामगांव, बुलढाणा, यवतमाळ जिल्ह्यांतर्गत आबासाहेब पारवेकर कला, वाणिज्य महाविद्यालय, यवतमाळ, वाशिम जिल्ह्यांतर्गत श्रीमती शकुंतलाबाई धाबेकर महाविद्यालय, कारंजा लाड, वाशिम आणि मातोश्री शांताबाई गोटे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, वाशिम यांना जिल्हास्तरीय आणि विद्यापीठस्तरीय पुरस्कार श्रीमती शकुंतलाबाई धाबेकर महाविद्यालय, कारंजा लाड, वाशिम या महाविद्यालयाचे प्राचार्य, कार्यक्रम अधिकारी व स्वयंसेवकांचा देवून कुलगुरूंनी सत्कार केला.

विद्यापीठ गीताने सुरु झालेल्या कार्यक्रमात कर्मयोगी संत गाडगे बाबांच्या प्रतिमेचे पूजन, पुष्पार्पण व दीपप्रज्वलन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले व याप्रसंगी मान्यवरांचे पुस्तक देवून स्वागत करण्यात आले. प्रास्ताविकतेतून रा.से.यो. प्रभारी संचालक डॉ. राजेश बुरंगे यांनी कार्यक्रम आयोजनामागील भूमिका मांडली. संचालन प्रा. नरेंद्र माने यांनी, तर आभार क्षेत्रीय समन्वयक डॉ. प्रसाद मडावी यांनी मानले. कार्यक्रमाला संलग्नित महाविद्यालयांचे प्राचार्य डॉ. विजय नानोटी, डॉ. सुभाष गवई, डॉ. रामेश्वर भिसे, डॉ.पी.जी. रोहणकर, डॉ. दिलीप काळे, डॉ.एम.एस. अली, डॉ. वसंत हेडवी, डॉ.सौ. निलीमा देशमुख, अधिसभा सदस्य प्रा. भय्यासाहेब मेटकर, डॉ. विजय कापसे, विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ. दिनेश सातंगे तसेच संस्थेचे अध्यक्ष, कार्यक्रम अधिकारी, शिक्षक व महाविद्यालयातील विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

---

प्रति,

मा. संपादक/जिल्हा प्रतिनिधी

दै............................... अमरावती.

**जनसंपर्क विभाग**
दि. ०६/०८/२०१९.

मा. महोदय,

आपणांस विनंती करण्यात येते की, सोबतच्या वृत्तास आपल्या लोकप्रिय वृत्तपत्रातून कृपया प्रसिद्धी द्यावी, ही विनंती.

आपला,

**(डॉ. विलास नांदुरकर)**
जनसंपर्क अधिकारी